नि.दि.दा.क्र. १४३३/२०१७
नि.क्र.१९
सिमा विरुध्द महादेव
CNR- MHOS09-002775-2017

# निशाणी क्र. १९ वरील आदेश

प्रतिवादी क्र. १ व २ यांनी प्रस्तुतचा अर्ज त्यांचेविरुध्द पारीत झालेला विनाकैफियत दावा चालविण्याचा दिनांक ०९/०७/२०१८ रोजीचा आदेश रद्द होण्यासाठी दाखल केला आहे.

**२.** अर्जामध्ये असे कथन आहे की, जबाबदावा दाखल करण्यासाठी आवश्यक ती कागदपत्रे मुदतीमध्ये मिळु शकली नसल्याने प्रतिवादी क्र. १ व २ यांना आपले म्हणणे दाखल करता आले नाही. सदर दाव्यातील मिळकतीमध्ये प्रतिवादी क्र. १ व २ यांचे कायदेशीर हक्कसंबंध असल्याने त्यांचेविरुध्द पारीत झालेला विनाकैफियतीचा आदेश रद्द होणे गरजेचे आहे. सबब, अर्ज मंजुर होण्यास विनंती केली आहे. अर्जाच्या पुष्ठयर्थ निशानी क्र. २० अन्वये प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे.

**३.** प्रस्तुत अर्जावर वादीने आपले म्हणणे दाखल करुन हरकत घेतली आहे. त्यांचे तर्फे असे कथन आहे की, प्रस्तुत प्रतिवादी हे दिनांक १५/१२/२०१७ रोजी मे. न्यायालयात हजर झाले आहेत. प्रस्तुत प्रकरणांत दिनांक ०९/१०/२०१८ रोजी पुराव्याचे शपथपत्र वादीने दाखल केले आहे. सदर साक्षीदाराचा उलटतपास नाही असा आदेश देखील पारीत झालेला आहे. प्रतिवादी क्र. १ व २ यांनी जाणुन बुजुन मे. न्यायालयाचा अमुल्य वेळ व्यर्थ करण्याच्या उद्देशाने व प्रकरण प्रलंबित करण्याच्या उद्देशाने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. सबब अर्ज जास्तीत जास्त दंडासह नामंजुर करण्यास विनंती केली आहे.

**४.** दोन्ही बाजूंना ऐकले. अभिलेखाचे अवलोकन केले.

**५.** प्रस्तुतचा दावा हा सरस—निरस मानाने वाटप होवुन वादीच्या हिस्साचा पृथक कब्जा मिळणेसाठी दाखल केलेला आहे. दिनांक ०९/१०/२०१८ रोजी वादीतर्फे पुराव्याचे शपथपत्र दाखल केले असुन त्यावर उलटतपास नाही असा प्रस्तुत प्रतिवादी क्र. १ व २ यांचेविरुध्द आदेश पारीत झाला आहे. अर्जामध्ये दिलेले कारण गृहीत धरता प्रस्तुतचा अर्ज मंजुर केला जावु शकतो. दाव्याचे कामकाज गुणदोषांवर चालवून दावा निकाली काढण्यासाठी व भविष्यातील सदरिल पक्षकारांचे न्यायालयीन कामकाजाचे प्रमाण

नि.दि.दा.क्र. १४३३/२०१७
नि.क्र.१९
सिमा विरुध्द महादेव
CNR- MHOS09-002775-2017

टाळण्याकरीता प्रतिवादी क्र. १ व २ तर्फे कैफियत अभिलेखावर येणे आवश्यक आहे. अर्ज मंजुर करुन कैफियत अभिलेखावर घेतल्याने वादींचे अपरिमित नुकसान होईल, असे वाटत नाही. याउलट, अर्ज नामंजुर केल्यास प्रतिवादींना त्यांचे म्हणणे दाखल करण्यासाठी संधी मिळणार नाही. नैसर्गिक न्यायतत्वाच्या दृष्टीकोणातून उभयपक्षकारांना आपापली बाजू सिध्द करण्याची संधी देणे आवश्यक आहे. परंतु, अर्ज मंजुर करताना वादींचे झालेले आर्थिक व वेळेचे नुकसान दुर्लक्षित करून चालणार नाही. सबब, न्यायाच्या दृष्टीकोणातून मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज वादीला रू.१५००/— इतका खर्च देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. खर्चाची रक्कम भरल्यानंतर पुढील योग्य ते आदेश पारीत केले जातील.

स्वाक्षरीत/—

दि.२०/०६/२०१९
कळंब.

(आर.आर.कुलकर्णी)
२ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
कळंब.

***CERTIFICATE***

I affirm that the contents of this P.D.F. file Order/Judgment are same word for word as per original Order/Judgment.

Name of Steno : G.N.Ubale, Jr. Clerk,
Court Name : Smt. R. R. Kulkarni,
2nd JT. CJJD, Kallam, Tq.Kallam
Dist.Osmanabad.
Order/Judgment date : 20/06/2019.
Order/Judgment
Signed by P. O. on : 20/06/2019.
Order/Judgment
Uploaded on : 20/06/2019.